| सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर<br>इमेल–cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>भ्रमरध्वणी क्र.९८१९२०८२७९ | |
|---|---|---|


## प्रेस नोट

दि.२८/०९/२०२४

## " व्हेल माशाची उलटी विक्री करण्याकरीता आलेल्या तीन इसमाना गुन्हे शाखा, घटक–०३ कल्याण यांनी केले जेरबंद "

दि.२७/०९/२०२४ रोजी गुन्हे शाखा, घटक– ०३ कल्याण कडील सहा.पोलीस उपनिरीक्षक/दत्ताराम भोसले यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, दुपारी ०२:०० वाजताचे सुमारास काही इसम मारुती सुझुकी कंपनीची राखाडी रंगाची वॅगनर गाडी क्रमांक–एम.एच. ४६–बी.ई–५४२६ मधुन व्हेल माशाची उलटी अनधिकृत रित्या जवळ बाळगुण विक्रीसाठी मौर्या धाब्याच्या बाजूला, बदलापुर पाईपलाईन रोड, मानपाडा, डोंबीवली पुर्व येथे येणार आहेत.

सदर मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा, घटक– ०३ कल्याण कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सापळा कारवाई करून तीन संशयीत इसमांना व्हेल माशाची उलटी अनधिकृत रित्या जवळ बाळगुण ती मारूती सुझुकी कंपनीची राखाडी रंगाची वॅगनर गाडी क्रमांक–एम.एच.४६–बी.ई–५४२६ मध्ये विक्री करण्याकरीता घेवुन आलेले असताना शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

नमुद सशंयीत इसमांकडे अधिक चौकशी करता त्यांची नावे १) अनिल राधाकृष्ण भोसले वय ५५वर्षे रा.ठि:–दत्त कृपा सोसायटी चाळ नं. ए/४४, रुम नं.१८, न्यु पनवेल, सेक्टर ६, जि. रायगड २) अंकुश शंकर माळी वय ४५वर्षे, रा.ठि:–गांव कासव, मु.पो. आपटा रसायनी, पनवेल, जि. रायगड. ३) लक्ष्मण शंकर पाटील वय ६३वर्षे, रा.ठि:–मु.पो. वांवजे गाव, मोहोदर, ता. पनवेल, एम.आय.डी.सी, तलोजा. नवी मुंबई अशी असल्याची माहिती प्राप्त झाली. नमुद तीन इसमांची व त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या वॅगनर गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये **५ किलो ६४२ ग्रॅम वजनाची ०६,२०,००,०००/–रु.(सहा करोड वीस लाख रूपये )** किमतीची सफेद रंगाच्या पिशवी मध्ये सेलो टेप लावुन गुंडाळलेली व्हेल माशाची उलटी मिळुन आली.

वर नमुद तीन्ही इसमाच्या ताब्यातुन व्हेल माशाची उलटी, एक मारूती सुझुकी कपंनीची वॅगनर गाडी, तसेच विविध कपंनीचे मोबाईल फोन असा **एकुण ०६,२२,१५०००/– रूपये किमतीची मुदद्देमाल** जप्त करण्यात आहे.

वरील नमुद तीन्ही इसमांनी आपसात संगनमत करुन व्हेल माशाचे उलटी बेकायदेशीर रित्या जवळ बाळगुन त्याची वाहतुक करुन विक्री करण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांचेविरूध्द मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. १०८५/२०२४ वन्य जीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम–३९,४४,४८,४९(सी), ५१,५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा, घटक– ०३ कल्याण कडुन करण्यात येत आहे.

प्रस्तुत यशस्वी कामगिरी मा.श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व मा. श्री. शेखर बागडे, सहा.पोलीस आयुक्त, (शोध १) गुन्हे ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, सपोनि/संतोष उगलमुगले, सपोनि/संदिप चव्हाण, सहा.पोलीस उपनिरीक्षक /दत्ताराम भोसले, पोहवा/विश्वास माने, पोहवा/विलास कडु, पो.कॉ./गुरूनाथ जरग, पो.कॉ./मिथुन राठोड, पो.कॉ./गोरक्ष शेकडे यांनी केलेली आहे.



( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर